**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 Special Cell –260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र. विशेष कक्ष/ 432 दिनांक : - 9 OCT 2019

प्रति,
१. मा. प्राचार्य/ सचिव,
सर्व संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : शिक्षक व शिक्षक समकक्ष पदे भरती करण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत....

संदर्भ : वरील विषयाचे मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा. क्र. विससं/कोवि/शिवि.अनु/२०१९–२०/३५५७ दि. २२/०८/२०१९ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भाने मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कडून शिक्षक व शिक्षकसमकक्ष पदे भरत असताना नियुक्ती प्राधिकारी यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना विद्यापीठास प्राप्त झालेल्या आहेत. त्यामध्ये महिला आरक्षण, दिव्यांग आरक्षण, SEBC व EWS आरक्षण, लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र, नविन पारिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना इत्यादी अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यासंदर्भातील सुचना निर्गमित केल्या आहेत. सदरच्या सुचना आपणास कार्यवाहीसाठी खालील प्रमाणे आदेशान्वये कळविण्यात येत आहेत :

**१. महिलांकरीता आरक्षण :**

**अ)** महिलांसाठी असलेले समांतर आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र. ८२/२००१/मसेसआ–२०००/प्र. क्र. ४१५/का–२ दि. २५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहिल.

**ब)** खुल्या संवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमी लेअर) महिला सदस्यांना महिलांसाठीचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

**२. दिव्यांगाकरीता आरक्षण :**

**अ)** शासनाच्या नियमाच्या तरतूदीनुसार दिव्यांगाकरीता ४ टक्के आरक्षण लागू राहिल. दिव्यांग व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळविण्यासाठी दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्के असणे आवश्यक आहे.

ब) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६—अ दि. २९/०५/२०१९ मधील तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

क) उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्र. अपंग/२०११/(२२/११)/मशि—१ दि. १२ सप्टेंबर २०१२ मध्ये नमूद केलेल्या विषयाकरीता पदे राखिव राहतील तथापि त्यांस शासन निर्णय दि. २९/०५/२०१९ मधील सर्व तरतूदी लागू राहतील.

**३. मराठा आरक्षण, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व मागास प्रवर्गातील आरक्षण :**

अ) जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातिचे प्रमाणपत्र देण्याची व त्याच्या पडताळणी विनिमय) अधिनियम २००० मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेल्या जातीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

ब) सामाजिक न्याय व विशेष सहारूय विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. सीबीसी—१०/२०१०/प्र.क्र.४७/मावक—५ दि. २६/०३/२०१० मधील तरतूदीनुसार आरक्षित पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांनी त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र किंवा जातीचे वैधता प्रमाणपत्रसाठी आवश्यक कागदपत्रे एका महिन्याच्या आत कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

क) सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम मधील तरतूदीनुसार ‘‘विमुक्त जाती —अ, भटक्या जमाती—ब, क, ड’’ या प्रवर्गासाठी विहित आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

ड) शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२०१६/प्र. क्र.२२८ए/१६/१६—ब दि.२९/०५/२०१७ व शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२०१६/प्र. क्र.२२८ए/१८/१६—ब दि.०७/०१/२०१९ आणि शासन परिपत्रक क्र.बीसीसी—२०१६/प्र. क्र.२२८ए/१८/१६—ब दि.२१/०८/२०१९ मधील तरतुदीनुसार रिक्त पद ठेवणे शक्य नसल्यामुळे व मागास प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास, मागास प्रवर्गाकरीता आरक्षित असलेले पद ०५ भरती वर्षामध्ये दरवर्षी शैक्षणिक वर्षाकरीता अदलाबदली करून किंवा ज्या मागास प्रवर्गातील पद आरक्षित आहे त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती करण्यात येईल. तथापि, प्रस्तुत अदलाबदली ही निव्वळ ‘‘अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती’’ याच प्रवर्गासाठी असेल.

इ) शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२०१८/प्र. क्र.५८१ए/१६—ब दि.०४/०७/२०१९ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) मधील सर्व तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

फ) शासन परिपत्रक क्र. बीसीसी—२०१९/प्र. क्र.११८ए/२०१९/१६—ब दि.१६/०२/२०१९ अन्वये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (इडब्ल्युएस) मधील सर्व तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

**४. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र :**

अ) विद्यापीठ/महाविद्यालयीन सेवेतील पदांकरीता अर्ज करण्यांकरिता महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नियम—२००५ दि. २८/०३/२००५ च्या तरतूदीनुसार अर्ज दाखल करताना विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करावे. प्रस्तुत प्रमाणपत्रात नमूद केल्याप्रमाणे

सध्या हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन असेल तर दि. २८/०३/२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवारास नियुक्ती अपात्र ठरविले जाईल.

**५. नविन पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना व इतर सूचना :**

**अ)** सध्या सेवेत असलेल्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयाप्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे. रूजू होतेवेळी नियुक्ती प्राधिकारी किंवा कार्यालयप्रमुख यांचे ना—हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधणकारक आहे.

**ब)** दि. ०१/११/२००५ नंतर नियुक्त झालेल्या उमेदवारांना वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अनियो/१००५/१२६/सेवा—४ दि. ३१/१०/२००५ नुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहतील. तथापि हा नियम वित्त विभागाचा शासन निर्णय दि. १२/०१/२००७ च्या तरतुदी पूर्ण करीत असलेल्या आणि सध्या निवृत्ती वेतनार्ह पदावर कार्यरत असलेल्यांना लागू होणार नाही.

**क)** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.मकसी—१००७/प्र. क्र.३६/का. ३६, दि. १०/०७/२००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सीमा विभागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदाकरीता अर्ज करता येईल. तथापि, त्यांनी सदर ८६५ गावातील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे बंधनकारक राहील. त्यानुसार उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण अधिवासी असणे आवश्यक आहे.

**ड)** प्रस्तुत सुरू असलेली भरती प्रक्रिया ही मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे प्रलंबित असलेल्या याचिका क्र.१२०५१/२०१५ याच्या अंतिम निकालाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

**इ)** परराज्यातील उमेदवाराने प्रस्तुत जाहिरातीमधील पदावर अर्ज दाखल करताना जरी तो उमेदवार मागास प्रवर्गातील असला तरी तो अराखिव गटामध्ये समाविष्ठ करण्यास पात्र ठरेल.

उपरोक्त नमुद केलेल्या अ. क्र. १ ते ५ मधील ठळक सुचना हया विद्यापीठातील (पूर्णवेळ व हंगामी) व संलग्नित महाविद्यालयांमधील जाहिरात प्रसिध्द करतेवेळी जाहिरातीमध्ये उल्लेख करणे बंधनकारक आहे, असे मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे. तसेच मागास प्रवर्गातील उमेदवार भरती करतेवेळी एखादया प्रवार्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास, पहिले ०५ भरती वर्षामध्ये शैक्षणिक वर्षाकरिता अशापध्दतीने अदलाबदलीने पद भरता येईल तथापि, मुळ पद ज्या प्रवर्गाकरीता राखीव आहे त्याच प्रवर्गाकरीता पद पुढील भरती वर्षामध्ये ते पद राखीव ठेवणे बंधनकारक राहील. तद्नंतर ०६ व्या वर्षी पद अदलाबदलीने पद पुर्णवेळ नियमित भरण्यात येईल व अदलाबदलीने भरलेल्या प्रवर्गामध्ये बिंदु—नामावलीमध्ये दर्शविला जाईल. प्रस्तुत पद सहाव्या वर्षी देखिल अदलाबदलीने भरती करता आले नाही तर सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. ०५/१२/१९९४ नुसार सदरहू प्रवर्गातील पद अनारक्षित करण्यांबाबत ०७ व्या वर्षी या कार्यालयामार्फत संचालनालयाकडे व शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित करावी. तथापि, संबंधीतांच्या नियुक्ती अदेशामध्ये संबधीतांची नियुक्ती राखीव पदावर अदलाबदलीने करण्यात आलेली असल्याबाबतची नोंद असणे आवश्यक आहे, असेही संदर्भिय शासन पत्रात नमूद करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे आरक्षित व अनारक्षित पदे अनुक्रमे सामाजिक आरक्षण (अनु.जाती व अनु. जमाती इ.) व अराखिव असा उल्लेख करून जाहिरातीमध्ये दर्शविण्यात यावीत. याव्यतिरीक्त विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेली शैक्षणिक अर्हता आणि आपल्याकडील इतर सुचना आपण जाहिरातीमध्ये समाविष्ठ कराव्या लागतील. प्रस्तुत सुचना महाविद्यालयांतील जाहिरात मान्यता देताना देखिल उल्लेख करणे गरजेचे असेल, असेही संदर्भिय शासन पत्रात नमूद करण्यात आले आहे.

तरी सदरहू दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि दि. ०७/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेनुसार पदभरती करण्यांबाबतची कार्यवाही सुरू करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ विभागीय सहसंचालक कार्यालयास अवगत करावा आणि याबाबत तक्रार अथवा हरकत प्राप्त झाल्यास नियुक्ती प्राधिकारी या नात्याने आरक्षण अधिनियम २००४ व आरक्षण अधिनियम २०१८ आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार सबंधितांवर कारवाईबाबत शासनाकडे कार्यवाही प्रस्तावित करणेत येईल याची कृपया दक्षता घ्यावी. असेही मा. सहसंचालक यांनी कळविलेले आहे.

सबब, उपरोक्त विषयासंदर्भात मा. विभागीय शिक्षण सहसंचालक यांच्या सूचनांचे सर्व सबंधितानी गार्भीयाने व काटेकोरपणे पालन करावे. तसेच संबधित संस्था/महाविद्यालय यांनी शिक्षक पदांचा जाहिरात मसूदा विद्यापीठास सादर करत असताना विद्यापीठातील विहीत जाहिरात प्रस्तावाबरोबर उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करून परिपूर्ण असा जाहिरात मसूदा विद्यापीठास मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

PS Pande

उपकुलसचिव
(विशेष कक्ष)

**उपकुलसचिव**
**विशेष कक्ष**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रत —

१. मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना माहितीसाठी.

२. मा. उपकुलसचिव आस्थापना व संलग्नता –१ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

३. अध्यक्ष, फुले आंबेडकर शाहु रिसर्च असोसिएशन (फास्टा) यांना माहितीसाठी.